- जय सहकार -

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित,

## अंबरनाथ जि. ठाणे

नोंदणी क्र - टीएनए/युएलआर/आरएसआर/(सीआर)/३७४/सन १९८९-९०

-: कार्यालय :-

१९९४, श्री महालक्ष्मी मंदीरा शेजारी, श्री महालक्ष्मी नगर,
अंबरनाथ (पूर्व) पिन ४२१५०१ जि. ठाणे,

---

" शुभ चिंतावे शुभ इच्छावे वचनी शुभ बोलावे
शुभ कर्माच्या सामर्थ्याने करावे जीवनाचे सोने."

---

" सहकारात ऐपतीपेक्षा पतिला महत्व आहे." स्थापना - २८ ऑगष्ट १९८९

---

| | |
|---|---|
| सभासद संख्या | ४६० |
| भाग भांडवल | ८७,३७०-०० |
| अधिकृत भाग भांडवल | २,००,०००-०० |
| बचत ठेवी | १,७५,५००-०० |
| कर्ज वाटप | २,९६ ५००-०० |
| खेळते भांडवल | २,६९,८३९-५० |
| वार्षिक उलाढाल | ३.०३,४८८-६५ |

---

# प्रथम

# वार्षिक अहवाल

## सन १९८९-९०

## श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित,
## अंबरनाथ. जि. ठाणे

# – संचालक मंडळ –

| | | |
|---|---|---|
| श्री. जयवंत बंडू काटकर SEM | - | चेअरमन |
| ,, अनंत नारायण आंबरे B.A. | - | व्हा. चेअरमन |
| ,, हणमंत सदाशिव घनवट | - | चिटणीस |
| ,, भिमराव यशवंत सुर्यवंशी B. Com. | - | खजिनदार |
| ,, सुभाष शामराव भावसार | - | संचालक |
| ,, अविनाश नारायण खानविलकर | | ,, |
| ,, रमेश शिवराम म्हस्के | | ,, |
| ,, भालचंद्र यशवंत माने | | ,, |
| ,, प्रकाश शंकर पाटील | | ,, |
| श्रीमती प्रतिभा वसंत पवार | | ,, |
| श्री. तुकाराम अंबाजी शेंडे | | ,, |
| ,, भगवान अर्जुन उतेकर | | ,, |
| ,, हरिश्चंद्र यशवंत येरुणकर | | ,, |

---

### अंतरर्गत हिशोब तपासनीस

कै. श्री. वसंत राजाराम पवार M.Com. दि.२८.८.८९ ते २१.३.९०

श्री. शंकरराव केशवराव दरेकर

श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव B. Com.

जय सहकार

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित,

अंबरनाथ जि. ठाणे.

## प्रथम वार्षिक सर्वसाधारण सभा

# जाहीर नोटीस

( फक्त सभासदाकरिता )

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची **प्रथम वार्षिक सर्वसाधारण सभा** ~~बुधवार~~ रविवार दिनांक ~~३~~ १४–१०–९० रोजी दुपारी ३ वा. श्री महालक्ष्मी मंदीराचे सभागृह, श्री महालक्ष्मी नगर, अंबरनाथ पूर्व येथे आयोजीत केली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

### – सभेपुढील विषय –

१) दिनांक २९–१०–८९ च्या प्रथम सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन १९८९–९० चा अहवाल, ताळेबंद, व नफा तोटा पत्रके जादाखर्चासह मंजूर करणे.
३) सन १९८९–९० चे नफा विभागणीस मंजूरी देणे.
४) सन १९९०–९१ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाज पत्रकांस मंजुरी देणे.
५) सन १९८९–९० चा अंतर्गत हिशोब तपासनिसांचा अहवाल वाचून मंजूर करणे.
६) सन १९९०–९१ सालाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीसांची निवड करणे.
७) संचालक मंडळाच्या सन १९९०–९१ ते ९२–९३ यां त्रैवार्षिक सालासाठी झालेल्या निवडणुकीचां निकाल जाहीर करणे.
८) पोटनियम दुरुस्तीबाबत विचार करणे. ( पोटनियम दुरुस्ती मसुदा अहवालमध्ये समविष्ट आहे. )
९) ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर अध्यक्षांचे परवाणगीने चर्चा.

**श्री. हणमंत सदाशिव धनवट**
चिटणीस

**श्री. जयवंतराव बंडू काटकर**
अध्यक्ष

---

**टीप –** १) सभासदांनी आपल्या सुचना अगर प्रश्न संस्थेच्या ऑफीसमध्ये ३० सप्टेंबर ९० पर्यंत लेखी पाठवाव्यात
२) सर्वसभासद बंधुभगिनींनी सभेस येताना अहवाल बरोबर आणावा.
३) गणपुर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच दिवशीं त्याच ठिकाणी सभेच्या कामकाजावरील विषयाबाबत सुरुवात होईल. त्यास गणपूर्तीचे बंधन रहाणार नाही.
४) ज्या सभासदांचे पत्ते बदलले आहेत त्यांनो त्यांच्या नवीन पत्याची सस्थेच्या ऑफीसमध्यें नोंद करावी.

"जय सहकार"

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ. जि. ठाणे.

# – प्रथम वार्षिक अहवाल –

## (सन १९८९–१९९०)

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

सप्रेम नमस्कार वि. वि.

संस्थेचे एक शिल्पकार व अंतरगत हिशोब तपासनीस माझे परममित्र प्रो. वसंतराव पवार यांचे दि. २१ मार्च ९० रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास आदरयुक्त श्रध्दांजली वाहून पतपेढीच्या पहिल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या प्रसगी आपणा सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो

आपल्या सर्वांच्या सहकार्याने प्रगतीपथावर असलेल्या संस्थेचा ३० जून ९० अखेर सपलेल्या सहकारीं वर्षांचा पहिलाच वार्षिक अहवाल संस्थची सांपत्तीक स्थिती दर्शविणारे ताळेबंद, नफातोटा पत्रके सन १९९०–९१ सालचे अदाजपत्रक आपल्यापुढे सादर करतांना मला अत्यानंद होत आहे.

संस्थेच्या प्रगतीबद्दल अहवालात कौतुक करणें म्हणजे स्वतःचें कौतुक करण्यासारखा प्रकार होईल. परंतु अल्पावधित संस्थेने केलेला नेत्रदिपक प्रगती व जनमानसात मिळविलेले मानाचे स्थान याची सविस्तर माहिती या अहवालात देणें माझे कर्तव्यच आहे.

सभासद, ठेवीदार, खातेदार, त्याचप्रमाणें मार्गदर्शक, हितचिंतक हे आपल्या पतसंस्थेचे खरेखुरे शिल्पकार आहेत. आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने व अतिनिर्मळ प्रेमाने आपण सर्वजण समाधानाच्या शिखरापर्यंत आलो आहोत. याचा मला अभिमान वाटतो. नागरिकांमध्यें संस्थेचे सभासद होणेविषयी वाढलेली उत्सुकता पहाता ही संस्थेच्या संचालक मंडळाने केलेल्या प्रामाणिक कामाची पावती असे मी समजतो.

संचालक मंडळानें परिश्रमपूर्वक पतसंस्थेची केलेली सर्वांगिण प्रगती खालील तक्त्यावरुन लक्षांत येईल.

| अ. नं. | तपशील | नोंदण पूर्व | अहवाल साली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | सभासद | ३०३ | १५७ | ४६० |
| २ | भाग भांडवल | ३०,३०० | ५७,०७० | ८७,३७० |
| ३ | ठेवी | – | १,७५,५०० | १,७५,५०० |
| ४ | कर्ज | – | २,९६,५०० | २,९६,५०० |
| ५ | खेळते भांडवल | – | २,६९,८३९–५० | २,६९,८३९–५० |
| ६ | नफा | – | ५,२७१–५० | ५,२७१–५० |

**ठेवी :-** ठेवी हा संस्थेच्या प्रगतीचा स्थैर्याचा पाया आहे. हा पाया मजबूत करण्यासाठी संचालक मंडळाने खूपच प्रयत्न केले आहेत. अहवाल सालात संस्थेकडे मुदत ठेवीच्या रुपात रु. १७५,५००/– जमा झाले आहेत. ही बाब संस्थेस निश्चितच भूषणावह आहे.

**नफा विभागणी :-** अहवाल साली संस्थेस ५२७१–५० रुपये नफा झाला आहे. त्याची कार्यकारी मंडळाने खालील प्रमाणें शिफारस केली आहे. त्यास सर्वानुमते मंजुरी द्याल अशी आशा आहे.

| अ न. | तपशील | प्रमाण | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण निधी | – | २६९–०० |
| २ | मुदत ठेवीवरील व्याज | | ४,५१०–०० |
| ३ | पुढील वर्षाकरीता शिल्लक नफा | | ४९२–९० |

**कर्ज :-** सभासदांची अडचण लक्षात घेऊन संचालक मंडळाने सभासदांना तत्परतेने, सुलभतेने आणि विना विलंब कर्ज सहाय्य देण्याचे वैशिष्टयपूर्ण धोरण अवलंबिले आहे. कर्जा विषयीच्या गरजा भागवून सभासदांच्या कुटुंबियांचे जीवन समृद्ध व सपन्न व्हावे ही सदिच्छा अहवाल साली सभासदांना एकूण रु. २,३६,५००/– कर्जवाटप झाले आहे.

**सभा :-** अहवाल सालांत संचालक मंडळाच्या एकुण मासिक सभा १० झाल्या. सभासदांच्या अडचणी लक्षांत घेऊन कर्जमंजुरीसाठी. संचालक मंडळाच्या तांतडीच्या २ सभा झाल्या असून सर्व ठराव सर्वानुमते मजूर करण्यांत आले आहेत. शिवाय दैनंदिन कामकाजात विचार विनिमय करुन निर्णय घेण्यासाठी दररोज सायंकाळी ७ ते ९–३० वाजेपर्यंत संचालक कार्यालयामध्यें हजर असतात. सचालकांचे उत्तम सहकार्य व मार्गदर्शनामुळे संस्थेची नेत्रदिपक प्रगती झाली आहे.

**आभार :-** संस्थेच्या उत्कर्षामध्यें अनेक मान्यवरांचे सहकार्य मार्गदर्शन व आशिर्वाद लाभले आहेत. त्यांच्या या सह–कार्याबद्दल ऋणनिर्देष व्यक्त करणें माझे आद्य कर्तव्य आहे ठाणे जिल्ह्याचे नेते व माजी राज्यमंत्री मा. श्री. नकुलजी पाटोल साहेब अंबरनाथचे माजी नगराध्यक्ष व अंबरनाथ शहर काँग्रेस कमिटोचे अध्यक्ष मा. श्रीं. प्रभाकर (दादासाहेब) नलावडे, तसेच श्री. महाजनसाहेब सहाय्यक निबंधक सहकारी सस्था, ता. उल्हासनगर श्री. पाटीलसाहेब सहकार अधिकारी, तसेच इतर अधिकारी व कर्मचारी, प्रो एस. व्ही. वर्वेसर, आर्किटेक्ट श्री आर. टी. जगताप, मा. श्री. अस्वलेसाहेब शाखाधिकारी ठाणें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक शाखा–अंबरनाथ, सौ. शोभना नलावडे, अध्यक्षा कल्याण शहर जिल्हा महिला काँग्रेस कमेटी सौ. पुष्पलता पाटील माजी नगरसेविका डोंबिवली नगर परिषद, श्री. खेरसर, श्री. रामभाऊ (दादा) कदम व श्री. अरुण शिर्के पदाधिकारी सरस्वती ना. पतपेढी; श्री. बि. आर. जगदाळे, श्री. हरिश्चंद्र जाधव, श्री. सुर्यकान्त राणे, व श्री. वासुदेव धुरे, पदाधिकारी सिंधुदुर्ग जिल्हा नागरी पतपेढी, श्री सामतसाहेब उपायुक्त कल्याण म. न. पा. अबरनाथ उपविभाग, श्री. श्रीधर खानविलकर पोलिस निरिक्षक, अंबरनाथ यांनी संस्थेंस दिलेल्या भेटी व केलेल्या सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने मी हार्दिक आभार मानतो. तसेच संस्थेचे अंतरगंत हिशोब तपासनीस श्री. शंकरराव केशवराव दरेकर व श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव यांनी उत्तमप्रकारे काम केले असून मार्गदर्शन केले आहे. त्याबद्दल संस्थेच्या वतीने धन्यवाद.

**श्रध्दांजली :–** संस्थेचे सभासद श्री. कृष्णा गोविंद पवार यांच्या मातोश्रींचे दुःखद निधन तसेच संस्थेच्या सभासद सौ. मिरा बसु परोळसांदे यांचे दुःखद निधनाबद्दल संस्थेच्या वतीने आदरयुक्त श्रध्दांजली.

**समारोप :–** आपणा सर्वांना अत्यंत कष्टातून या सहकारी रोपटयाचे रोपन केले आहे. त्यास सर्वांनी मिळून खतपाणी घालुया व विशालवटवृक्ष बनवुया हीच मनिषा.

सहकारी क्षेत्रामध्ये कोणत्याही सहकारी संस्थेंचा उत्कर्ष, भरभराट तिच्या वसुलं बर अवलंबून असतो. आपल्या संस्थेची वसुली शंभर टक्के आहे हा वसूल दरमहा जमा होण्यासाठी संस्थेच्या सभासदांनी संस्था आपली आहे ही भावना मनामध्यें ठेवन त्यांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याचा या ठिकाणी आवर्जुन उल्लेख करणें आम्हा संचालक मंडळाचे अद्य कर्तव्य आहे.

माननीय सभासद बंधू भगिनींनो आपण आम्हा संचालक मंडळावर जो अमोल असा विश्वास दर्शविला आहे, त्यांस कोणत्याही प्रकारचे ग लबोट न लावता आपल्या सर्वांचे मनांत नितांत आदर बाळगून. संस्थेचा कारभार जबाबदारीने निस्पृहतेने करुं अशी ग्वाही देऊन संस्थेचा आर्थिक परिस्थिती दर्शविणारा सन १९८९–९० सालचा अहवाल ताळेबंद व नफा–तोटा पत्रक संचालक मंडळाचेवतोने आपले समोर मंजुरीसाठी नम्रपणें सादर करीत आहे. तरी त्यास आपणा सर्वांनी मजूरी द्यावी, ही विनंती. धन्यवाद.

जयहिंद – जयसहकार

संचालक मंडळाचे वतीने

**श्री. जयवंतराव बंडू काटकर**

चेअरमन

## कार्यकारी मंडळाच्या सभा

अहवालसाली कार्यकारी मंडळाच्या एकूण १२ सभा झाल्या.

| सदस्याचे नांव | सभेस उपस्थिती |
|---|---|
| श्री. जयवतराव बडू काटकर | १२ |
| ,, अनंतराव नारायण आंबरे | ११ |
| ,, भिमराव यशवंत सुर्यवंशी | १२ |
| ,, हणमंत सदाशिव घणवट | ११ |
| ,, हरिश्चंद्र यशवंत येरुणकर | १२ |
| ,, भगवान अर्जुन उतेकर | ११ |
| ,, रमेश शिवराम म्हस्के | १२ |
| ,, अविनाश ना. खानविलकर | ११ |
| ,, भालचंद्र यशवंत मानें | ८ |
| ,, प्रकाश शंकर पाटील | १० |
| ,, सुभाष शामराव भावसार | ९ |
| ,, तुकाराम अंबाजी शेंडे | ११ |
| श्रीमती प्रतिभा वसंत पवार | ८ |

श्री. बाळासाहेब शिवराम सोनजे
उपमुख्याध्यापक
महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ.

# अभिप्राय

सन्माननीय सभासद, महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी, अंबरनाथ. आपल्या पतपेढीचा अहवाल पाहीला असता खरोखरच अभिमान वाटतो प्रथम वर्षातच एवढी प्रचंड उलाढाल करणारी ही आपलींच पतपेढी होय, **'विना सहकार नही उध्दार'** हेच खरे त्यात आपला प्रतिसाद अत्यंत मोलाचा ठरला हे सांगणे न लगे.

परंतु ह्या प्रचंड रकमेची उलाढाल करणारी माणसं आपल्या मध्ये आहेत त्यांचे कौतुक, अभिनंदन करांवे तेवढे थोडेच आहे. रोज संध्याकाळी बाहेरुन घरी येतांना पतपेढीच्या कार्यालयाकडे डोकावून पाहिले तर जमीनीवर एक बैठक बसलेली कायम दिसते. अर्थात ही सारी मंडळी आपला नोकरीचा व्याप सांभाळुन एका पैशाचेही मानधन वा मेहनताना न घेणारी मंडळी, मोठ्या उत्साहाने कार्यरत दिसते. विशेषत: मुंबईहून ड्यूटी करुन मरगळलेल्या अवस्थेत घरी आलेली मंडळी पाहिली की त्यांची अवस्था बघण्यासारखी होते. परंतु त्याच मुंबईच्या ऑफीसमधून काम करुन परत आलेलो परतु जणु काही सकाळच्याच उत्साही वातावरणात कार्यमग्न झालेली जमिनीवर बैठक मारुन रोजकीर्द, खतावण्या, पावती पुस्तके इ. चोख व्यवहार ठेवणारी व्यक्ती म्हणजे 'धनवट आबा' चेहऱ्यावर कोणत्याही प्रकारचा थकवा नसलेली व सुंदर हस्तक्षरात टापटीपीने ठेवलेले दप्तर पाहिले की कौतुक करावेसे वाटते. अनेक क्षेत्रात ज्यांचे हात गुंतलेले आहेत. क्षणाचाहीं वेळ मिळणार नाही. अशा स्वरुपाच्या कार्यात गुंतलेले आपल्यां महालक्ष्मी रहिवाशी संघाचे शिल्पकार व अनेक राजकीय धूरधूरांचे आधारस्तंभ श्री. जयवंतराव काटकर साहेब हे सतत धनवट आबायांच्या पुढयात बैठक मारुन मार्गदर्शन करतांना दिसतात. कामात काही दिरगाई होत आहे असे वाटल्यास जणू ते आपल्या घरचेच काम आहे. ते त्वरीत झाले पाहिजे म्हणुन सारखा तगादा लावणारी व्यक्ती श्री. सूर्यवंशी साहेब कोणत्याही वेळी अडलेले काम करण्यास व उत्साह वाढविण्यास प्रवृत्त करणारे भाई आंबरे अशी ही पतपेढोच्या संचालक मंडळावर असलेली अनन्य साधारण व्यक्थीमत्व लाभलेल्या व्यक्तींच्या प्रेरणेंनेंच हे आजचे आपल्या पतपेढीचे वैभव दिसते. इवलेसे लावलेले रोपटे परंतु आज त्याचे विशाल वटवृक्षात रुपांत्तर होऊ पहात आहे. मित्र हो ! हे सारे सहकाराचे फळ खरे परंतु अशी सत्शिल, सत्प्रतृतीची सेवाभावी माणसं आपल्याला लाभलीत यापेक्षा आणखीन दुसरा आपला सुवर्णकाळ कोणता असू शकेन ?

मला नक्कीच खात्री आहे की ही एक आपली पतपेढी आंता अल्पावधीतच आपल्या शहरातील एक अग्रगण्य बँक होईल यात तिळमात्र संशय नाही. अशीच उत्तरोत्तर प्रगती आपल्या ह्या हाती घेतलेल्या कार्याची होवो ही सद्भावना. आपल्या कार्याचा शुभ चिंतक.

# पोट नियम दुरुस्ती

| पोट नियम क्र. | संघाचे पोट नियम | पोट नियम दुरुस्ती | दुरुस्तीची कारणे |
|---|---|---|---|
| क १–२ | संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. २ ००,०००–०० असेल सदर अधिकृत भाग भांडवल निबंधकाच्या वेळोवेळी घेतलेल्या विशिष्ट परवानगीने वाढविण्यास मुभा राहील प्रत्येक भागाची किमत १०/ रु. राहील ती किमत एक रकमी भरली पाहिजे. | संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,०००/ असेल सदर अधिकृत भाग भांडवल निबंधकाच्या वेळोवेळी घेतलेल्या विशिष्ट परवानगींने वाढविण्यास मुभा राहील. प्रत्येक भागाची किमत १०/– रु. राहील ती किमत एक रकमेने भरली पाहिजे. | समासदाकडून वाढते शॅअर्स मिळत असल्यामूळे |
| फ १–१ | सदस्यांना १०% ते १८% च्या वार्षिक व्याजाच्या दराने व्यवस्थापक समितिने निश्चित केलेल्या व्याजदरानुसार व्यवस्थापक समित ने मान्य केलेल्या एक अगर दोन सदस्याच्या वैयक्तिक जमिनावर ( कोणता बोजा नसलेला ) ऋणको सदस्याच्या स्थावर मिळकतीवर कर्ज देता येईल. या पोटनियमाच्या कोणत्याही एका अगर अधिक नियमांच्या तरतुदीन्वये कोण हि सदस्य ५०००/– रुपयापेक्षा अधिक रक्कमेस संस्थेचा कर्जदार असला पाहिजे. ( संस्थेच्या एकूण भांडवलाच्या १/८ पेक्षा अधिक रक्कम एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता आणि (एकूण भांडबलाच्या) १/१६ पेक्षा अधिक रक्कम २ वर्षापेक्षा अधिक मुदती–करता कर्जाऊ देता येणार नाही ) जर कर्जाच्या रक्कमा रोख दिल्या तर त्या रक्कमा व्यवस्थापक समितीच्या एका तरी सदस्याच्या उपस्थित दिल्या गेल्या पाहिजे. | सदस्यांना १०% ते १८% च्या वार्षिक व्याजाच्या दराने व्यवस्थापक समितीने निश्चित केलेल्या व्याजदरानुसार व्यवस्थापक समितीने मान्य केलेल्या एक अगर दोन सदस्याच्या वैयक्तीक जामिनावर आणि ( कोणताच बोजा नसलेला ) ऋणको सदस्याच्या स्थावर मिळकतीवर कर्ज देता येईल. या पोटनियमाच्या कोणत्याही एका अगर अधिक नियमाच्या तरतुदीन्वये कोणीही सदस्य १०,०००/– रुपयेपेक्षा अधिक रक्कमेस संस्थेचा कर्जदार नसला पाहिजे. ( संस्थेच्या एटूण भांडवलाच्या १/८ पेक्षा अधिक रक्कम, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता आणि ( एकूण भांडवलाच्या ) १/१६ पेक्षा अधिक रक्कमेत २ वर्षापेक्षा अधिक मुदती करीता कर्जाऊ देता येणार नाही.) जर कर्जाच्या रक्कमा रोख दिल्या तर त्या रक्कमा व्यवस्थापक समितीच्या एका तरी सदस्याच्या उपस्थितीत दिल्या गेल्या पाहिजेत. | वाढत्या महागाईमुळे सभासदांच्या होणाऱ्या अडचणी सुलभतेने भागविता याव्यत या उद्देशाने |

| | | | |
|---|---|---|---|
| फ १–२ | १) स्थावर मिळकतीच्या गहाणवटीवर रुपये १५०००/ पर्यंत कर्ज देता येईल. परंतु अशा स्थावर मिळकतीची किंमत कर्ज दिलेल्या रक्कमेच्या दुपटीपेक्षा कमी असता कामा नये. अशा स्थावर मिळकतीच्या सर्व प्रकारच्या धोक्यासाठी विमा उतरविला पाहिजे आणि त्यावरच व्यवस्थापक समितीच्या संमतीने ऋणको सदस्याचा वैयक्तिक जामिन ( Security) घेतला पाहिजे.<br>२) रुपये ५०००/ पर्यंतच्या कर्जाऊ रक्कमा व्यवस्थापक समितीनें संमत केलेल्या दोन सदस्यांच्या वैयक्तिक जामिनावर देता येतील<br>३) तातडीचे कर्ज रु. १०००/– पर्यंत १० महिने पेक्षा कमी मुदत साठी देता येईल. | स्थावर मिळकतीच्या गहाणवटीवर रुपये २५,००० पर्यंत कर्ज देता येईल. परंतु अशा स्थावर मिळताची कर्ज दिलेल्या रक्कमेच्या दुप्पटीपेक्षा कमी असता कामा नये. अशा स्थावर मिळकतीच्या सर्व प्रकारच्या धोक्यासाठी विमा उतरविला पाहिजे आणि त्यावरच व्यवस्थापक समितीच्या संमतीने ऋणको सदस्याचा वैयक्तिक जामिन [Security] घेतला पाहिजे.<br>२) रुपये ५०००/– पर्यंतच्या कर्जाऊ रक्कमा व्यवस्थापक समितीने समत केलेल्या दोन सदस्यांच्या वैयक्तिक जामिनावर देता येतील<br>३) तातडीचे कर्ज रु. १०००/– पर्यंत १० महिनें पेक्षा कमी मूदतीसाठी देता येईल. | |
| ड १–१ | ५) | ५) कोणत्याही व्यक्तिस नाममात्र सदस्य करून घेता येईल.<br>( महाराष्ट्र को–ऑप ॲक्ट १९६० नियम २४ पोट कलम १ व २ आणि कलम २७ पोटकलम ८ प्रमाणे ) | संस्थेच्या हितचिंतकांच्या अपेक्षें नुसार |

श्री महालक्ष्मी नागरी पतपेढीस हार्दीक शुभेच्छा

## अंबरनाथ मैत्रीणी औधोगिक उत्पादक सहकारी संस्था लि. अंबरनाथ.

| सो. निलम आंबरे | कु. मिरा कथेट | सो. शोभना नलावडे |
| --- | --- | --- |
| सेक्रेटरी | खजिनदार | अध्यक्ष |

---

धन्यवाद ! धन्यवाद !! धन्यवाद !!!

महालक्ष्मी नगरातील रेशनिंगची समस्या, रेशनिंग दुकान चालू करुन सोडविल्या बद्दल अंबरनाथ मैत्रीणी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था लि, अंबरनाथ व अंबरनाथ मधील सामान्य रहिवाशाच्या आर्थीक गरजा भागवीत असल्या बद्दल श्री महालक्ष्मी नागरी सहकारी संस्थेस धन्यवांद !

## श्री महालक्ष्मी रहिवासी संघ

श्री, हरिश्चंद्र येरुणकर
सरचिटणीस

श्री, भिमराव सुर्यवंशी
अध्यक्ष

# मान्यवरांच्या सदिच्छा भेटी

## कोकणचे खंबीर नेतृत्व



श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढीला आज रोजी भेट दिली संस्थेचे काम समाधानकारकरित्या चालले आहे. कार्यकर्ते कामात रस घेताना दिसले. संस्थेच्या कामाची व्याप्ती अधिक वाढविण्याचे प्रयत्न करावेत. संस्थेस शुभेच्छा.

**श्री. नकुल पाटील**
माजी राज्यमंत्री
महाराष्ट्र शासन
३०-६-९०

## आमचे स्फुर्तीस्थान



अंबरनाथ येथील श्री महालक्ष्मी नागरी पतपेढीस भेट देण्याचा योग आला पदाधिकारी व सभासद एकजूटीने कीती काम पध्दतशीरपणे काम करु शकतात. याचा प्रत्यय आला, ह्या विभागाला ही पतपेढी खरोखरच वरदान आहे व तिच्या माध्यमातून ह्या विभागातील नागरीकांना सर्व सहाय्य मिळो व संस्थेचा उत्कर्ष व्हावा हिच प्रार्थना.

**श्री. प्रभाकर नलावडे**
माजी नगराध्यक्ष
अंबरनाथ.
३०-६-९०

# वार्षिक अहवालाचे परिशिष्ट १९८९-९०

| | | |
|---|---|---|
| **सोसायटीचे कार्यक्षेत्र** | :- | **अंबरनाथ शहर मर्यादित** |
| **संस्थेच्या शाखा** | :- | **कोठेही नाही.** |
| **सभासद** | :- | **फक्त रितसर व्यक्तीगत सभासदांचीच नोंदणी केलेली आहे.** |
| **भागभांडवल** | :- | **संस्थेचे भाग-भांडवल फक्त वैयत्तीक सभासदांनीच उभारले आहे** |
| **कर्ज** | :- | **कर्ज देणाऱ्या कोणत्याही संस्थेकडून अद्याप कर्ज घेतलेले नाही.** |

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ जि. ठाणे.

दि. २८।८।८९ ते ३०।६।९० अखेरचे तेरीज पत्रक क्र. १.

| जमा | तपशिल | | खर्च |
|---|---|---|---|
| ४६०–०० | प्रवेश फी | | -- |
| ८७३७०–०० | भाग | | -- |
| २९६००–०० | सभासद कर्ज | | २,९६,५००–०० |
| ७,७९८–२० | कर्ज व्याज | | -- |
| ६६७–४५ | बॅंक व्याज | | -- |
| — | संस्था नोंदणी खर्च | | -- |
| ८५५–०० | फार्म विक्री | | ८५१–०० |
| — | सादीलवार | | -- |
| — | स्टेशनरी | | ३८४–८५ |
| १२३८–०० | अनामत | | २.८१३–३० |
| १,७५,५००–०० | मुदत ठेव | | १,२३८–०० |
| — | शिल्लक :– | | -- |
| — | रोख | २०८२–०५ | |
| | टी.डी,सी.सी. बॅंक (ओ.डी.) | ३८०–५५ | |
| | | १७०१-५० | १७०१–५० |
| ३,०३,४८८–६५ | | | ३,०३,४८८–६५ |

| हणमंत स. घनवट | भिमराव य. सुर्यवंशी | अनंत ना. आंबरे | जयवंत बं. काटकर |
|---|---|---|---|
| चिटणीस | खजिनदार | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित,

अंबरनाथ, जि. ठाणे.

## नफा तोटा पत्रक क्र. ३ दि. ३० जून ९० अखेर

| उत्पन्न तपशील | | खर्च तपशील | |
|---|---|---|---|
| बँक व्याज | ६६७-४५ | संस्था नोंदणी खर्च | ८५१-०० |
| कर्जावरील व्याज | ७७९८-२० | स्टेशनरी | २८१३-३० |
| फॉर्म विक्री | ८५५-०० | किरकोळ | ३८४-८५ |
| | | निव्वळ नफा | ५२७१-५० |
| | ९३२०-६५ | | ९३२०-६५ |

## ताळेबंद पत्रक क्र. २ दि. ३० जून ९० अखेर

| कर्ज व देणे | | जिंदगी व येणे | | |
|---|---|---|---|---|
| राखीव निधी | ४६०-०० | सभासद कर्ज | | २,६६,९००-०० |
| भाग भांडवल | ८७,३७०-०० | अनामत | | १,२३८-०० |
| मुदत ठेव | १,७५,५००-०० | शिल्लक :- | | |
| अनामत | १,२३८-०० | १) रोख | २०८२-०५ | |
| निव्वळ नफा | ५,२७१-५० | २) टिडीसीसी ओ.डी. | ३८०-५५ | |
| | | | १७०१-५० | १७०१-५० |
| | २,६९,८३९-५० | | | २,६९,८३९-५० |

वरील हिशोब उपलब्ध कागद पत्रावरुन तपासले ते बरोबर आहेत,

श्री. शंकरराव केशवराव दरेकर

श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव बी. कॉम.

अंतरगंत हिशोब तपासणीस

हणमंत स. घनवट
चिटणीस

भिमराव य. सुर्यवंशी
खजिनदार (बी.कॉम)

अनंत ना. आंबरे
उपाध्यक्ष (बी.ए.)

जयवंतराव काटकर
अध्यक्ष (SEM)

# सभासदांना सूचना

१) आपल्या पत्यात बदल झाल्यास त्याची सूचना पतपेढीस द्यावी म्हणजे अहवाल पत्रपाठविणें सुलभ होईल.

२) सभासदास वारसा नेमता येतो, ज्यांनी वारस दिलेला नाही. त्यांनी अर्ज करुन वारस नेमावेत. त्यामुळे ह्याच्या पश्चात वारसांना अडचणी येणार नाहीत.

३) आपली ठेव रक्कम, आपल्या पश्चात कोणास द्यायची याची नोंद केली गेली नसेल, तर आपल्या हिताच्या दृष्टीने ताबडतोब नोंद करण्याची दक्षता घ्यावी.

४) आपली पत व पतपेढीचा दर्जा वाढविण्यासाठी कर्जाचे हप्ते नियमित भरुन सहकार्य करा व त्याचा फायदा लाभांश रुपाने मिळवा.

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढीची उद्दिष्टये

१) सभासदांमध्यें काटकसर स्वावलंबन व सहकाराची भावना निर्माण करणे.

२) आपल्या सभासदांना आपत्ती काळात उपयोगी पडणें.

३) आपल्याच सहकार्यातुन अन्यांचे जीवनमान सुधारणें.

४) अल्पबचतोची सवय निर्माण करणें.

५) वाजवी शर्तीवर कर्ज मिळवून देण्यास मदत करणे.

६) वरील उल्लेखीत उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी इतर कामे हाती घेणे.

# आवाहन !

प्रिय सभासदांना विनम्र आवाहन ! मी पतपेढीचा अध्यक्ष या नात्याने आपणा सर्व सभासदांना आवाहन करु इच्छितो की, आपली ही विशाल उद्दिष्टयें साध्य करावयाची असतील तर मोठया भांडवलाची आपणास आवश्यकता आहे. भाग भांडवल जसे जमा होईल त्या प्रमाणात आपल्या गरजा भागविणे सोईचे व्हावे यासाठी आपण स्वतः आपले मित्र, स्नेही यांचेकडून ठेवीद्वारे जास्तीत जास्त भांडवल उभारण्यासाठी आपल्या अनेक सहकार्यांच्या हाताची अपेक्षा करतो. आपल्या ठेवीवर आकर्षक व्याज दिले जाईल.

तरी आपण माझ्या वरील आवाहनास योग्य तो प्रतिसाद द्याल ही अपेक्षा करुन आपण आपल्या लहानश्या रोपटयास खत पाणी घालू या व त्यांचा विशाल वटवृक्ष बनवू या !

जयहिन्द –

'बिना सहकार नही उध्दार'

अध्यक्ष

**श्री. जयवंतराव काटकर**

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित,
# अंबरनाथ जि. ठाणे

## लेखा परिक्षकाचा अहवाल

आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित अंबरनाथ या संस्थेचा सोबत जोडलेल्या सन १९८९–९० चा तेरीज, नफा–तोटा पत्रक व ताळेबंदाचें लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणें व विश्वासाप्रमाणें जरुर ती सर्व माहिती व खुलासे आम्हास उपलब्ध करुन दिलेले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणोतुन जितपत दृष्टोपत्तीस येईल त्यावरुन संस्थेंने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्या खालील नियम व संस्थेच्या पोट–नियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणें योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली. आहेत.

३) आम्ही तपासलेले तेरीज नफा–तोटा पत्रक व ताळेबद संस्थेच्या हिशोबाचो पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहेत.

४) आमच्या मते आमच्या संपूर्ण माहीतीप्रमाणें तसेच आम्हांला देण्यांत आलेल्या खुलाशावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० व त्या खालील नियमान्वयें अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी माहिती देतात.

अंबरनाथ
दिनांक १ सप्टेंबर ९०

अंतरगंत हिशोब तपासणीस

श्री. शंकरराव केशवराव वरेकर

श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव B. Com.

## सर्व भागधारक व ठेवीदार याना
## नूतन वर्ष सुख समृद्धीचे
## व भरभराटीचे जावो.



*श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित*
*अंबरनाथ.*

BOOK–POST

श्री /श्रीमती

प्रकाशक : श्री. जयवंतराव बंडू काटकर,चेअरमन– श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या. अंबरनाथ.

मुद्रक : अंबरनाथ मुद्रणालय, फोन नं २४३६